Coverage Report: TCS IT Wiz – Mumbai Edition

**Publication:** Tarun Bharat
**Date:** 8/11/2014
**Edition:** Mumbai
**Page No:** 2
**Headline:** ‘TCS IT Wiz 2014’ Mumbai round from 16 November

# ‘टीसीएस आयटी विझ’ सोळा नोव्हेंबरला

वार्ताहर
वांद्रे

टाटा कन्सलटन्सी सर्व्हीसेस (टीसीएस)ची ‘टीसीएस आयटी विझ २०१४’ ही स्पर्धा मुंबईत होणार आहे. १६ नोव्हेंबरला वांद्रे रेक्लेमेशन येथील लिलावती रुग्णालयासमोरील इंडियन एज्युकेशन सोसायटी, माणिक सभागृह येथे स्पर्धा होईल.

इयत्ता आठवी ते बारावीतील विद्यार्थी विझमध्ये सहभागी होऊ शकतात. स्पर्धेसाठी कोणत्याही प्रकारचे प्रवेशशुल्क नाही. विझमध्ये सहभागी होण्यास इच्छूक असलेली कोणतीही शैक्षणिक संस्था दहा संघ पाठवू शकते. एका संघामध्ये फक्त दोनच स्पर्धेक असू शकतील, असे टीसीएसतर्फे सांगण्यात आले.

इच्छूक संस्थांनी आपल्या प्रवेशिका १४ नोव्हेंबर पर्यंत शामला पद्मनाभन, मनिषा शेट्टी यांच्याकडे, टीसीएस आयटी विझ कोऑर्डीनेटर, टाटा कन्सलटन्सी सर्व्हिसेस, (टीसीएस हाऊस), रॅव्हेलीन स्ट्रीट, २१ डीएस मार्ग, फोर्ट, मुंबई–४००००१ या पत्यावर पाठवाव्यात. अधिक माहितीकरीता ०२२–६७७८९०८०/९०८१ या क्रमांकावर संपर्क साधावा.

टीसीएस आयटी विझ आंतरशालेय आयटी क्वीझ उपक्रम आहे. माहिती तंत्रज्ञान कौशल्ये विकसीत करणे, विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानाकडे नेऊन त्यांचे ज्ञान वाढवणारे प्रभावी माध्यम आहे. या क्वीझ मधील बहुतेक प्रश्न हे शैक्षणिक पुस्तकाच्या बाहेरचे असतात. त्यामुळे विद्यार्थ्यांना शालेय पुस्तकाच्या बाहेरचा अभ्यास करणे भाग पडत, यामुळे विद्यार्थ्यांचा बौद्धीक पातळी वाढते.